# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२५/२०२१

**अपिलार्थी, श्री. विजय मधुसुदन मालवणकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१,**
सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था वेंगुर्ला,
तांडेल बिल्डींग, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.
सिंधुदुर्ग प्रधान कार्यालय, सिंधुदुर्ग नगरी,
ता.जि.सिंधुदुर्ग

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक,**
सहायक निबंधक सहाकारी संस्था कुडाळ,
पोईपकर बिल्डींग, माठेवाडा कुडाळ, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.८.२०२० | २८.८.२०२० | ४.९.२०२० | ५.१०.२०२० |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.२६.११.२०२० रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त बाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात, माहिती दिलेली नाही, माहिती लपविली आहे असे नमूद केले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, अपिलार्थी यांनी दि.२६.८.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*दि.५.४.२०१९ च्या श्री. विजेंद्र मधुसुदन मालवणकर यांचे तक्रारी अर्जावरील कारवाई व त्या सोबतचे कागदपत्रांबाबत.*" अशा प्रकारची माहिती मागितली होती. त्या अनुषंगाने त्यांनी दिनांक २८.८.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिली आहे.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.५.१०.२०२० रोजी सुनावणी घेऊन, अर्जदार यांचे अपिल अमान्य करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी या आयोगाद्वारे माहिती अर्ज दि.२६.८.२०२० वर दाखल द्वितीय अपिल क्रमांक क्र. के.आर. १६५८/२०२० बाबत सुनावणी घेऊन अंतिम निकाल दिलेला आहे व त्याच माहिती अर्जावर एक दुसरे द्वितीय अपिल आयोगाकडे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोंकण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालयामार्फत प्राप्त झाले व त्यावर नवीन द्वितीय अपिल क्र. २५/२०२१ प्रमाणे नोंद घेण्यात आली. द्वितीय अपिल क्र.के.आर. २५/२०२१ आजरोजी सुनावणीसाठी आयोगासमोर आहे. तथापि, ज्या माहिती अर्जावर हे द्वितीय अपिल आहे त्या माहिती अर्जावर दाखल द्वितीय अपिल क्र. के.आर. १६५८/२०२० वर अंतिम निकाल

आयोगाद्वारा दि.२६.२.२०२१ रोजी दिलेला असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणावर पुन्हा आदेश देण्याची आवश्यकता नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**